शिक्षण उपसंचालक कार्यालय- पुणे विभाग,
१७,डॉ.आंबेडकर मार्ग,लाल देवळासमोर, पुणे-४११ ००१.
दुरध्वनी क्र.-०२०-२६१२५६९६/२६१२२२१७ ई मेल आय डी क्र. dydpune@gmail.com
वेब साईट- WWW.dydepune .com

जा.क्र. शिउसं/प्राथ-२०४ जु.रा.कु./मान्यता/पुवि/२०२३/13446
दिनांक : 27 DEC 2023

प्रति,
अध्यक्ष/ सचिव,डी.व्ही.पाटील प्रतिष्ठान, शिक्रापूर, ता.शिरुर जि. पुणे

विषय : महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ पासून इ.६ वी ते इ. १२ वी, सर्व शाखा सी.बी.एस.ई. संलग्नित इंग्रजी माध्यमाची दर्जावाढीने शाळा सुरु करणेसाठी स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर निर्गमित शासन मान्यतेचे अनुषंगाने करावयाचे कार्यवाहीबाबत.
डी.व्ही.पाटील प्रतिष्ठान, शिक्रापूर, ता.शिरुर जि. पुणे संचलित तक्षशिला गुरुकूल पब्लिक स्कूल, गट क्र. १८१०, पाटवस्ती रोड, मोजे शिक्रापूर ता. शिरुर जि. पुणे

संदर्भ : १.श्री.विवेक सकपाळ ,कक्ष अधिकारी,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय मुंबई यांचेकडील आदेश जा.क्र. एसएफएस- १०२१/प्र.क्र. ७०५/एसएम-२ दिनांक ६.१.२०२३
२ अध्यक्ष, डी.व्ही.पाटील प्रतिष्ठान, शिक्रापूर, ता.शिरुर जि. पुणे यांचेकडील पत्र जा क्र टीजीपीएस/६४९/२३ दिनांक ९.११.२०२३

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत डी.व्ही.पाटील प्रतिष्ठान, शिक्रापूर, ता.शिरुर जि. पुणे संचलित तक्षशिला गुरुकुल पब्लिक स्कूल, गट क्र. १८१०, पाटवस्ती रोड, मोजे शिक्रापूर ता. शिरुर जि. पुणे या इ.६ वी ते इ. १२ वी, सर्व शाखा सी.बी.एस.ई. संलग्नित दर्जावाढीने प्राथमिक शाळेला जोडून उच्च प्राथमिक ते उच्च माध्यमिक इंग्रजी माध्यम संदर्भीय क्र. १ चे शासन आदेशात नमूद असलेनुसार शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ पासून संदर्भीय क्र. १ चे शासन आदेश मधील अ.क्र. १ ते १२ अटी व शर्तीस अधिन राहून सदर दर्जावाढ करण्याची मान्यता देण्यांत आलेली आहे.

सदर संदर्भीय क्र. १ चे शासन आदेशातील अ.क्र. १ ते १२ अटी व शर्ती आपल्या संस्थेस/ शाळेस बंधनकारक असून त्यानुसार पुढील आवश्यक ती कार्यवाही महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ आणि महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) नियम २०२० मधील तरतुदीनुसार करण्यांत यावी.

(राजेश आहेर)
अध्यक्ष,क्षेत्रस्तरीय प्राधिकरण,तथा
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१

प्रत : माहितीस्तव व कार्यवाहीस्तव रवाना
१. श्री विवेक सपकाळ, कक्ष अधिकारी शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२
२. शिक्षणाधिकारी (माध्यमिक/ प्राथमिक) जिल्हा परिषद, पुणे

तात्काळ/महत्वाचे

कालमर्यादा

जा.क.शिउसं/प्राथ-२/स्वयंअशाळा/मान्यता/पुवि/१३/ ३११४१/8

शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,पुणे-१ यांचे कार्यालय

दिनांक:- २/१२/२०१३.

प्रति

अध्यक्ष/सचिव,

डी.व्ही. प्रतिष्ठान शिक्रापुर ता. शिरूर जि. पुणे

विषय - सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत नवीन शाळा स्थापन करणे,तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेसाठी परवानगी देण्याबाबत..

संदर्भ १. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र. १,६ व २४) २०१२.

२. महाराष्ट्र शासनाचे शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांचा शासन निर्णय क्र.स्वयंअ-२०१३/(८५/१३)(II)/माशि-१ दिनांक ०५ ऑक्टोंबर २०१३.

वरील विषयी आपणांस कळविण्यात येते की,आपल्या संस्थेने वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये **नवीन शाळा स्थापन करणेकरिता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेकरिता** प्रस्ताव सादर केला होता.त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्रमांक-०२ च्या शासन निर्णयानुसार **नवीन शाळा स्थापन करणेकरिता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेकरिता** खालील अटी व शर्तीवर परवानगी दिलेली आहे.

| शासन यादी अ.क्र. | जिल्हा | अर्जदार संस्थेचे नाव | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पत्ता. | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/दर्जावाढ | मान्यता वर्ग/इयत्ता | मान्यतावर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १९४ | पुणे | डी.व्ही. प्रतिष्ठान शिक्रापुर ता. शिरूर जि. पुणे | गुरुकुल पब्लिक स्कुल, शिक्रापुर ता. शिरुर जि. पुणे | इंग्रजी | नवीन शाळा | प्राथमिक | **२०१३-१४** |

अटी व शर्ती :-

१. संस्थेने शाळा परवानगीसाठी विहित केलेले माध्यम व शाळेचे ठिकाण इत्यादींमध्ये भविष्यात कोणतेही बदल करता येणार नाही.

२. शासनाने ज्या ठिकाणी परवानगी दिलेली आहे,त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

३. या अधिनियमातील तरतुदींनुसार शाळा स्थापन करण्यास दिलेली परवानगी शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून असेल.

४. शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये ज्या वर्गास परवानगी दिलेली आहे त्या वर्गा व्यतिरिक्त इतर वर्ग चालू करता येणार नाहीत.

५. परवानगी मिळालेपासून १८ (अठरा) महिन्यांच्या आत व्यवस्थापनाने शाळा सुरु न केल्यास सदर परवानगी आपोआप रद्दबातल ठरेल.

६. परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा यांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशाचे,कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन )मुख्य अधिनियम २०१३ मधील सर्व तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहील.

७. शाळा इमारतीच्या दर्शनीभागात सर्व जनतेच्या माहिती करिता स्वयं अर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी पात्र नवीन शाळा/वर्ग असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील.

८. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळेचे भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.

९. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी प्राप्त शाळांना बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ मधील तरतुदींची पुर्तता करुन व्यवस्थापनाने शाळा मान्यतेकरिता विहित नमुन्यात एक महिन्याच्या आत प्रथम मान्यतेचा प्रस्ताव सक्षम अधिका-यांकडे सादर करणे आवश्यक राहील.

१०. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना UDISE मध्ये माहिती भरतांना स्वयंअर्थसहाय्यित शाळा / वर्ग म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यकराहील.

११. शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहित करेल अशा नियमांची अंमलबजावणी करणे संस्थेला बंधनकारक राहील.

२८/११/१३

(सुमन शिंदे)

शिक्षण उपसंचालक,

पुणे विभाग पुणे-१